# 19 फेब्रुवारी

**आजचा सुविचार :**

आपण चंदन असल्याची घोषणा चंदनाला कधीच करावी लागत नाही. त्याचा गंध वाऱ्याबरोबर आपोआप पसरत जातो.

**आजचे पंचांग :**

वार – शनिवार

दिनांक : 19 फेब्रुवारी 2022

तिथी – माघ

नक्षत्र – उ. फाल्गुनी

सुर्योदय – सकाळी 6.58 वाजता

सूर्यास्त – सायंकाळी 6. 36 वाजता

**आजचे दिनविशेष :**

1630 ला जनतेचे जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म.

1986 ला आज पहिल्यांदा संगणकीकृत रेल्वे आरक्षण तिकिटांची सुरुवात झाली.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1) Brick – वीट 2) Brown - तपकिरी 3) Care – काळजी 4) Chain – साखळी

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) त्रिकोणाला किती बाजू असतात?

2) कोणता रंग शांततेचे प्रतिक आहे?

3) श्वसन क्रियेमध्ये कोणता वायू आपण शरीरातून बाहेर सोडतो?

4) रातांधळेपणा कोणत्या विटामिन च्या कमतरतेमुळे होतो?

**बोधकथा :**

## कावळयाची शिक्षा आणि चिमणीचे बक्षीस

एक होता आळशी आणि लबाड कावळा. पहिल्या गोष्टीत पाहिला ना? तोच तो. तो लोळ लोळ लोळला, तर शेणाने भरला. त्याने वर पाहीले तर त्याचा डोळा फुटला. त्याने बिळात हात घातला तर त्याला विंचू चावला. तो देवळात गेला तर त्याला मार मिळाला. बिचारा रड रड रडला अन् घरी येऊन झोपी गेला.

एक होती कामसू चिमणी. पहिल्या गोष्टीत पाहिली ना घर स्वच्छ ठेवणारी? तीच ती. ती लोळ लोळ लोळली. तर मोत्याने भरली. तिने वर पाहिले तर तिला चंद्रहार मिळाला. तिने बिळात हात घातला तर तिला अंगठी मिळाली. ती देवळात गेली तर तिला साडी-चोळी मिळाली. ती साडी-चोळी नेसली, पालखीत बसली अन् घरी येऊन झोपी गेली.

**तात्पर्य -** लबाडपणाचे ध्येय कधीच साध्य होत नाही.